ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 5434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २ एप्रिल, १९५८ | अंक १४

## विविध माहिती

**महात्माजींचें स्मारक**—राजकोट म्युनिसिपालिटीनें महात्मा गांधींचें स्मारक करण्याचें ठरविलें असून त्यासाठी १ लाख रुपये मंजूर केले आहेत. महात्माजींनीं आपलें बालपण ज्या घरांत घालविलें त्याच्या जवळच हें स्मारक करण्यांत येणार आहे. राजकोट येथील सत्याग्रहाच्या चळवळीशीं निगडित असणाऱ्या कांहीं इमारतीहि म्युनिसिपालिटी ताब्यांत घेणार आहे.

**दारूबंदीसाठी स्त्रियांचे प्रयत्न**—अहमदाबाद येथील विविध स्त्री-संघटना दारूबंदीच्या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी एक संघ स्थापन करणार आहेत. ज्या वस्तींत दारूबंदी कायद्याचा भंग होत आहे तेथें जाऊन दारू पिणाऱ्यांच्या आया-बहिणी-बायकांनीं आपलें वजन खर्च करून दारूबाजांना परावृत्त करावें, असा आग्रह धरण्यांत येणार आहे.

**दहा हजार प्रवासी नेणाऱ्या बोटी**— एका अमेरिकन बोट वहातुक कंपनीसाठी हॉलंडमध्यें चार प्रचंड बोटी बांधण्यांत येणार आहेत. प्रत्येक बोटीचें वजन १,२०,००० टन असेल आणि तीवर १० हजार प्रवाशांची सोय करण्यांत येईल. ह्या बोटींना प्रत्येकी ८५ कोटी डॉलर्स खर्च येईल. अटलांटिक समुद्र त्या चार दिवसांत पार करतील.

**रशिआचा तिसरा उपग्रह**— रशिअन शास्त्रज्ञ तिसरा उपग्रह अंतराळांत सोडण्याची तयारी करीत आहेत. हा उपग्रह ५ ते ६ टन वजनाचा असेल आणि तो प्रथम चंद्राला प्रदक्षिणा घालून परत येईल व मग पृथ्वीभोंवती फेर धरील असें म्हणतात.

**मिरज-कुर्डुवाडी रेल्वेरस्ता**— मिरज ते कुर्डुवाडी हा अरुंद रुळाचा रेल्वेमार्ग रुंद रुळाचा करण्याबद्दलची प्राथमिक पहाणी पूर्ण करण्यांत आली आहे. ह्या संबंधीचे अहवाल लवकरच रेल्वेबोर्डाकडे निर्णयासाठीं जातील. ह्या कामासाठी १० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**नागपूरमधील पाणी कर**—नागपूर कॉर्पोरेशननें आपल्या १९५८-५९ च्या अंदाजपत्रकांत पाण्यावरील कर ३३ टक्क्यांनीं कमी करण्याची सूचना केली आहे. सूचनेला राज्य-सरकारची संमति मिळाली आहे असें समजतें. करांत कपात केल्यामुळें कॉर्पोरेशनला ५ लाख रुपये उत्पन्नाला मुकावें लागेल.

**खंबायत आखातांत तेलाचा शोध**—खंबायतच्या आखातांत तेल सांपडतें किंवा काय हें पाहण्यासाठी रशिअन तंत्रज्ञ सध्या खोदकामाचीं यंत्रें बसवीत आहेत. रशिअन शास्त्रज्ञांनीं भारत सरकारला सादर केलेल्या अहवालांत ह्या भागांत तेल सांपडण्याची शक्यता सूचित केली आहे.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—भारतामधील छोट्या उद्योग-धंद्यांना मदत म्हणून अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशननें ४२ लाख डॉलर्स मंजूर केले आहेत. अशा धंद्यांना उपयोगीं पद्धतीच्या अशीं दोन नमुनेदार वर्कशॉप्स पुरविण्याची तयारी पश्चिम जर्मन सरकारनें दाखविली आहे. जपानकडूनहि कांहीं प्रकारची मदत मिळण्याचा संभव आहे.

**जपानची नवी मोटार**— सर्वसामान्य लोकांना विकत घेण्यास परवडेल अशी एक मोटारगाडी जपाननें तयार केली आहे. मोटारींत चार माणसें बसूं शकतील. मोटारीची किंमत अवघी १,१७० डॉलर्स आहे. संपूर्णपणें जपानमध्येंच बनविण्यांत आलेली ही गाडी दर तासाला जास्तींत जास्त ५० मैल वेगानें जाऊं शकेल.

**निष्कलंक पोलादाचें उत्पादन**— भारतांत निष्कलंक पोलादाचें व इतर मिश्र धातूंचें उत्पादन करणारा कारखाना काढण्यासाठी कांहीं परदेशी कारखान्यांकडून योजना मागविण्यांत आल्या आहेत. परदेशी कारखान्यांकडून आलेल्या प्राथमिक अहवालांचा भारताचें उद्योगखातें सध्या विचार करीत आहे.

**सहकारी संस्था बंद**—१९५२ ते १९५७ ह्या कालांत मद्रास राज्यांत १,२०० सहकारी संस्था बंद करण्यांत आल्या व सहकारी संस्थांतून १,९०,००० रुपयांची अफरातफर करण्यांत आली. ही माहिती देतांना राज्य सरकारचे मजूरमंत्री म्हणाले, कीं खाजगी अगर सार्वजनिक मालकीच्या विभागांपेक्षां अफरातफरीचें हें प्रमाण अधिक आहे, हें म्हणणें खरें नाहीं.

**दिल्ली येथें प्राणिसंग्रहालय**—दिल्ली येथें तयार करण्यांत येत असलेल्या प्राणिसंग्रहालयासाठी व त्याभोंवतालच्या उद्यानासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ३० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. उद्यानासाठी आतांपर्यंत ९.४५ लाख खर्च झाले आहेत. दिल्लींत प्राणिसंग्रहालय नव्हतेंच.

**दांत काढण्याचें नवें तंत्र**— रशिअन वैद्यकीय शास्त्रज्ञांनीं दांत उपटण्याचें एक नवीन यंत्र शोधून काढलें आहे. प्रथम किडक्या दांताला एक पदार्थ लावण्यांत येतो व नंतर ध्वनि-लहरींचा उपयोग करणाऱ्या ह्या नव्या यंत्रानें दांत काढण्यांत येतो. ध्वनिलहरींच्या उपयोगानें दातांमधील नसा बधिर होतात व दांत काढतांना दुखत नाहीं.

**जमीन धारण करण्याची मर्यादा**—मद्रास राज्यांत करण्यांत येणाऱ्या जमीन सुधारणा विषयक कायद्याचा मंत्रिमंडळांत विचार चालू आहे. बागाइत जमिनीबाबत जास्तींत जास्त ३० ते ३५ एकरांपर्यंत व जिराइत जमिनीबाबत १०० एकरांपर्यंत मर्यादा घालण्यांत येण्याचा संभव आहे.

**फ्रेंच कंपनीला नोटीस**—हिंदुस्थान शिपयार्ड ह्या बोटी बांधणाऱ्या कंपनीला सल्ला देण्यासाठी नेमण्यांत आलेल्या फ्रेंच सल्लागार कंपनीला कराराप्रमाणें सहा महिन्यांची नोटीस देण्यांत आली आहे. बोटी बांधण्याच्या कामीं सल्ला देण्यासाठी भारताला अजूनहि परकीय तज्ज्ञांची मदत लागते. अद्याप नवीन सल्लागार ठरविण्यांत आलेले नाहींत.

**कर्ज घेण्यास नकार**—ब्रह्मदेशांत दोन धरणें बांधण्यासाठी रशिआकडून कर्ज घेण्याचें ब्रह्मदेशाच्या सरकारनें ठरविलें होतें. धरणाच्या खर्चापैकी ४५ टके खर्च ब्रह्मदेशाच्या सरकारनें करावयाचा होता. पण जरूर ती रक्कम सरकारला उभारतां न आल्यानें धरणें बांधण्याचें रद्द करण्यांत आलें आहे. अर्थातच रशिआचें कर्जहि घेण्यांत येणार नाहीं.

**अमेरिकेंतील मंदीवर उपाय**—अमेरिकेंत आलेल्या मंदीच्या लाटेमुळें ५० लाख कामगार बेकार झाले आहेत. ह्या आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी प्रेसिडेंट आयसेनहोअर ह्यांनीं सार्वजनिक कामासाठी २५० कोटी डॉलर्स खर्च करण्याची सूचना केली आहे. ही रक्कम मध्यवर्ती सरकार, राज्यसरकार व स्थानिक संस्था ह्यांनीं उभारावयाची आहे.

**पाणी देतां येत नाहीं**—उत्तर प्रदेशांतील रिहंड ह्या ठिकाणीं बांधण्यांत येत असणाऱ्या धरणाचें पाणी मध्यप्रदेशांतील शेतीसाठी देतां येणार नाहीं, असें उत्तर प्रदेश सरकारनें मध्यप्रदेश सरकारला कळविलें आहे. हें धरण मुख्यत: वीज निर्मितीसाठी बांधण्यांत येत असल्याचें सांगण्यांत आलें आहे.

**सीलोनला तांदुळाचा पुरवठा**—तांदूळ देऊन त्याच्या बदला रबर घेण्याचा करार चीन व सीलोन ह्यांच्या दरम्यानें झाला आहे. ह्या करारास अनुसरून सीलोन चालू वर्षांत चीनकडून ३,००,००० टन तांदूळ घेणार आहे. तांदुळाची किंमत अद्याप ठरावयाची आहे.

**भारत ते अमेरिका दर्यावर्दी वहातूक**—भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान मालाची वहातूक करण्याचें सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें ठरविलें आहे. पांच वर्षांपूर्वी अशी वाहतूक कंपनी करीत असे. पण पुरेशा वेगवान् बोटी कंपनीजवळ नसल्यानें त्यावेळीं वहातूक बंद करण्यांत आली होती.

**इंडोनेशिआला रशिअन बोटी**—इंडोनेशिआच्या सरकारनें रशिआकडून १० मालवाहू बोटी विकत घेतल्या आहेत. बोटी विकत घेतां याव्या म्हणून रशिआनें इंडोनेशिआला ३५.७ कोटी पौंड कर्ज दिलें होतें. इंडोनेशिआच्या ३,००० बेटांमधील वहातूक मुख्यत: बोटींनीच चालते.

**विजेच्या कपातीचा परिणाम**—मद्रास राज्यांतील कारखान्यांना करण्यांत येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत २५ टके कपात करण्यांत आल्यामुळें राज्यांतील कापडाच्या उत्पादनांत घट झाली आहे. त्याचप्रमाणें कृत्रिम रत्नें तयार करण्याचा एक कारखाना बंद पडला आहे. हा कारखाना नुकताच सुरू करण्यांत आला होता.

**तेलाची सहकारी गिरणी**—नगर जिल्ह्यांतील संगमनेर तालुक्यांत भुइमुगापासून तेल काढण्याची एक सहकारी गिरणी काढण्याचे घाटत आहे. सुमारें १०३ खेड्यांतील लोकांनीं ह्याबाबत पुढाकार घेतला असून आतांपर्यंत भांडवलासाठी म्हणून २५,००० रुपये जमा केले आहेत. सरकारकडून मदतीची अपेक्षा करण्यांत येत आहे.


दैनंदिन खर्चातील काटकसरीतून भरीव बचत करण्यासाठी आमच्या
होम सेव्हींग सेफ
बचत योजनेचा फायदा घ्या.
सविस्तर माहिती मुख्य कचेरींत अगर कोणत्याही शाखा कचेरींत मिळेल.
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४.
टेलिफोन: २७०९४
स्थापना १९१८
शाखा: फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · बेळगांव.


# भोर स्टेट बँक लि.
[ स्थापना : १९४४ ]
## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.
शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. वा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.
वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, जि. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २ एप्रिल, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेच्या कर्तव्यांत कसूर

इंडियन बँक्स असोसिएशनची वार्षिक सभा नुकतीच झाली, त्यावेळीं असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. सी. एच. भाभा, ह्यांनीं गेल्या वर्षातील बँकिंगचा आढावा घेतला. रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण झाल्यापासून, तिच्या अधिकाऱ्यांचें स्वातंत्र्य कमी झालें आहे आणि सरकारला योग्य वेळीं योग्य सूचना देण्याची तिचेबाबत अपेक्षा फोल ठरत आहे, अशी त्यांनीं तक्रार केली.

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नराचा अधिकार आणि त्याचें स्वातंत्र्य, ह्याविषयीं पार्लमेंटांत मुद्दा उपस्थित करण्यांत आला होता. सरकार रिझर्व्ह बँकेच्या बाबतींत हस्तक्षेप करीत नाहीं, असें सरकारी अधिकारी व मंत्री वारंवार सांगत आले असले, तरी रिझर्व्ह बँक सरकारच्या अर्थखात्याच्या तंत्रानें चालते अशी समजूत प्रसृत झालेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या महत्त्वाच्या स्थानास व तिच्याकडून अपेक्षा असलेल्या कार्यास ही गोष्ट पोषक नाहीं, हें उघड आहे. रिझर्व्ह बँकेला सूचना देण्याचा सरकारला कायदेशीर अधिकार आहे हें खरें असलें, तरी त्या अधिकाराचा वारंवार वापर रिझर्व्ह बँकेचें स्वातंत्र्य हरण करणारा आहे. रिझर्व्ह बँकेच्या घटनेंत थोडी दुरुस्ती करून डायरेक्टरांच्या नेमणुकीबाबत सुधारणा केली आणि रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेबद्दल जाहीर आश्वासन दिलें तर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व बोर्ड ह्यांना मोकळेपणानें व निर्भयतेनें मतप्रदर्शन करतां येईल. रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची नव्हती, तेव्हां तिच्या अहवालांतून आर्थिक परिस्थिति व धोरणें ह्यासंबंधीं उपयुक्त व मार्गदर्शक आढावा घेण्यांत येई; त्या आढाव्याकडे लोकांचें लक्ष वेधून राही. तशा प्रकारची कामगिरी आतां होत नाहीं. "ट्रेंड आणि प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया." ह्या आपल्या वार्षिक प्रकाशनांत, सरकारी आर्थिक धोरणांविषयीं आणि सरकारला स्वतःचा अधिकार चालविण्याची जी गरज भासली त्याविषयीं रिझर्व्ह बँक मूग गिळून आहे! रिझर्व्ह बँकेनें वास्तविक अशा हस्तक्षेपांच्या परिणामाविषयीं आणि आर्थिक निर्बंधाविषयीं प्रांजल मत व्यक्त करणें आवश्यक आहे. पण, आतां रिझर्व्ह बँक सरकारी झालेली आहे!

## रुपयाची पत कमी झाली

रुपयाची आंतरराष्ट्रीय बाजारांतील किंमत एक-दोन वर्षापूर्वी चांगली होती. रुपयाचें चलन अत्यंत स्थिर मानलें जात होतें व चलनाधिकारी रुपयाची किंमत उत्कृष्ट रीतीनें जतन करीत असल्याचा जगांत लौकिक होता. परंतु, गेल्या वर्षी भारतीय रुपयाच्या आशियांतील चलनांतील नेतृत्वास धक्का बसला; त्याची पत कमी झाली. इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडून मदत मिळूनहि रुपयाचा तोल सावरता आला नाहीं आणि रिझर्व्ह बँक कायद्यांतील चलनविषयक मजबुतीच्या तरतुदी ऑर्डिनन्स काढून लवचिक करण्याची पाळी आली. रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील सोनें व विदेशी रोखे ह्यांची बेरीज २०० कोटी रु. झाली म्हणजे पुरें आहे, अशी ती दुरुस्ती आहे. ह्यापैकी ११५ कोटी रु. चें सोनेंच असावयास हवें. म्हणजे रिझर्व्ह बँकेजवळील चलनाचा आधार कमी करून तो खर्चासाठी घेतां येणें शक्य झालें; इतकेंच नव्हें तर किमान आधाराची ही अटसुद्धां बाजूला ठेवून कारभार करण्याचा अधिकार ऑर्डिनन्सनें देऊन ठेवला. अशा तऱ्हेची परिस्थिति निर्माण होण्यापूर्वीच सरकारला त्याबद्दल समज देणें हें रिझर्व्ह बँकेचें वास्तविक कर्तव्य होतें. सरकारची उघळपट्टी रिझर्व्ह बँक असहायतेनें पहात बसली; चलनाचा आधार कमी करणारी दुरुस्ती घडून येण्याची पाळी बँकेनें येऊंच द्यायला नको होती.

## नोटा आणि सोनें साठविण्याची वाढती प्रवृत्ति

हिंदी बँकिंगची प्रगति गेल्या वर्षी समाधानकारक झाली. ठेवी वाढल्या, त्याचप्रमाणें कर्जासाठी मागणीहि वाढत गेली. १९५७ मध्यें चलनी नोटांत फक्त ४०.७२ कोटी रुपयांची वाढ झाली, पण शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत २९३ कोटी रुपयांची भर पडली आणि ठेवींची रक्कम १४०५ कोटी रुपये झाली. २९३ कोटी रुपयांच्या वाढीपैकीं १२३ कोटी रुपयांची वाढ एकट्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वांट्यास आली. इकडे ठेवी वाढत आहेत, तर तिकडे लोकांची नोटा व सोनें साठविण्याची आणि बँकिंगचा उपयोग न करतां रोखीनें व्यवहार करण्याची वृत्तिहि वाढत चालली आहे, असें आढळून येत आहे. लहान गांवांतूनच नव्हे, तर मोठ्या शहरांतूनहि ही प्रवृत्ति वाढत आहे, ही गोष्ट बँकिंगच्या प्रसाराच्या दृष्टीनें चिंतनीय आहे. ह्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीबाबत काळजीपूर्वक चौकशी करण्यांत यावी आणि सरकारनें वेळींच उपाययोजना करावी; नाहींतर परिस्थिति आणखी बिघडेल, असें श्री. भाभा ह्यांनीं सुचविलें आहे.

## बचतीचा आटत जाणारा झरा

बचतीचा झरा आटत चालला असल्याचीं लक्षणें दिसत आहेत. १९५६ मध्यें अल्प बचतींच्या द्वारा १०० कोटी रु. उभे करतां येतील अशी सरकारची अपेक्षा होती; प्रत्यक्ष वसुली ६८ कोटी रुपयेच झाली. १९५७-५८ च्या पहिल्या नऊ महिन्यांत फक्त ३० कोटी रुपये ह्या मार्गानें जमा झाले आहेत. व्याजाचा दर आकर्षक असूनहि आणि इतर सवलती देऊनहि सरकार अधिक रक्कम मिळवूं शकली नाहीं. उत्पन्न-खर्चांत फूस राहिली, तरच बचत होणार, हें उघड आहे. व्यक्तींना आतां बचत करावयाला जमतच नाहीं. व्यक्तींच्या बचतींतून सरकारला पैसा मिळावा ही कल्पनाच स्वप्नवत् वाटूं लागली आहे. बचतीसाठी करावा लागणारा स्वार्थत्याग त्यापासून होणाऱ्या कायद्याचें मानानें भरमसाट वाटतो; प्रत्यक्ष फायद्याचा अनुभव क्वचितच येतो. बचतीचा झरा आटण्याच्या कारणांची चौकशी रिझर्व्ह बँकेनें केली तर उपाययोजना करणें सोपें जाईल.

## कुटुंबनियोजन आणि वाढती लोकसंख्या

भारताचे आरोग्यमंत्री श्री. करमरकर ह्यांच्या अध्यक्षत्वासाली कुटुंब-नियोजन बोर्डाची बैठक दिल्ली येथें भरली होती. कुटुंब-नियोजनाचा प्रश्न भारताच्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत महत्त्वाचा झाला आहे. त्याचें महत्त्व ओळखून मध्यवर्ती सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्यासाठीं पहिल्यापेक्षा अधिक पैशाची तरतूद केली आहे. तथापि, लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न केवळ सरकारच्या प्रयत्नांनीं सुटण्यासारखा नाहीं. अखेर आपल्या कुटुंबांतील माणसांची संख्या किती असावी हें प्रत्येक व्यक्तीनेंच तारतम्यानें ठरवावयाचें आहे. म्हणूनच राष्ट्रीय नियोजनांत लोकसंख्येचें नियोजन येऊं शकत नाहीं. भारतांत लोकसंख्या फार वाढली आहे असें जेव्हां म्हटलें जातें त्यावेळीं त्याचे दोन अर्थ होतात. एकतर देशांतील जननाचें दरहजारी प्रमाण बरेंच मोठें आहे, आणि देशांतील लक्षावधि लोक जेमतेम कसेतरी जगत आहेत. ह्या परिस्थितीचा विचार केला तर कुटुंबनियोजनाच्या मार्गानेंच वाढत्या लोकसंख्येला आळा बसूं शकेल हें पटण्यासारखें आहे. ह्या बाबतींत सरकारला कुटुंबनियोजनाची माहिती लोकांना पुरविण्याचें काम मात्र करतां येईल. डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते आणि आरोग्यकेंद्रें ह्यांच्या साह्यानें अशी माहिती पुरवणें शक्य आहे. भारतांत आज बालमृत्यूंचें प्रमाण खूप आहे. म्हणजे मुलें जन्माला येतातहि पुष्कळ व मरतातहि पुष्कळ. ह्याच्या उलट, त्यांचें जननाचें प्रमाण घटलें पाहिजे आणि त्यांच्या मृत्यूचें प्रमाणहि घटलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहिल्यास लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न वाटतो तितका बिकट नाहीं.

जपानच्या सरकारनें ह्या विषयासंबंधीं प्रसिद्ध केलेला अहवाल ह्या संदर्भात उद्बोधक आहे. १९४७ च्या सुमारास जपानमध्यें दरसाल १५ लाख मुलें जन्म पावत होतीं. हा देश लहान व साधनसंपत्तीच्या बाबतींत गरीब आहे. त्यामुळें इतक्या वेगानें वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नाकडे सरकारचें व जनतेचें लक्ष विशेष रीतीनें वेधलें गेलें आणि उपाययोजना करण्यास प्रारंभ झाला. ह्याचा परिणाम असा झाला कीं, १९५० च्या सुमारास जपानमधील दर हजारी जननाचें प्रमाण ३० पेक्षाहि खालीं आलें. १९५६ च्या आसपास तर ते १९ इतकें खालीं आलें. त्याचप्रमाणें बालमृत्यूंच्या प्रमाणांतहि अशीच घट होत चालली. १९५६ सालीं बालमृत्यूंचे दर हजारीं प्रमाण ७८ इतकें खालीं आलें. महायुद्धापूर्वी जपानमधील बालमृत्यूंचें दर हजारीं प्रमाण जवळ जवळ दुप्पट होतें. पूर्वी जपानमधील परिस्थिति भारतासारखीच होती. जपानमध्यें कुटुंबनियोजनाचा जसा परिणाम झालेला आहे तसाच तो पाश्चिमात्य देशांतहि झालेला आढळून येतो. ह्यावरून कुटुंबनियोजनाच्या मार्गानें लोकसंख्येवर परिणामकारक नियंत्रण ठेवतां येतें असें दिसून येतें. आईबापांच्या इच्छेला व सांपत्तिक स्थितीला अनुसरून स्वेच्छेनें कुटुंब-नियोजन करण्यांत आल्यास भारतामधील लोकसंख्येचा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेल ह्यांत शंका नाहीं. त्याचबरोबर देशांतील निरोगी लोकांची संख्याहि वाढत जाईल.

## मुंबई येथील प्रयोग यशस्वी

### पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकेतून चेकने पैसे काढण्याची आणखी दहा ठिकाणीं सवलत दिली जाणार

मुंबईच्या जनरल पोस्ट ऑफिसमध्यें पोस्ट ऑफिसच्या सेव्हिंग्ज बँकेतून चेकनें पैसे काढण्याच्या प्रयोगाला यश लाभल्यामुळें देशांतील सर्व प्रमुख आणि विभागीय उप-टपाल कचेऱ्या यांमध्यें ही सवलत देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. सुरुवातीला, १ एप्रिल १९५८ पासून कलकत्ता, मद्रास, दिल्ली, नवी दिल्ली, अंबाला, पाटणा, लखनौ, नागपूर, जयपूर आणि अहमदाबाद येथील हेड पोस्ट ऑफिसेस आणि निवडक सब पोस्ट ऑफिसेस यांत ही पद्धति सुरू करण्यांत येईल. ह्या पद्धतीचा उपयोग करण्यासाठीं ठेवीदार साक्षर असला पाहिजे व त्यानें किमान २५० रु. शिल्लक ठेवलेले असले पाहिजेत अशी अट आहे. नव्या ठेवीदारांना ह्या सवलतीचा फायदा घ्यावयाचा असल्यास पोस्ट कचेरीला माहिती असलेल्या इसमानें त्यांची ओळख पटवून दिली पाहिजे. चेकनें पैसे काढण्यासाठी ठेवीदाराला कोणत्याहि प्रकारचा जादा आकार पडणार नसून एका वा अधिक व्यक्तींच्या नांवांनीं संयुक्त खातीं ठेवणाऱ्या सज्ञान ठेवीदारांना ही सवलत मिळेल. खाजगी कंपन्यांना मात्र एम्प्लॉइज प्राव्हिडंड फंडाच्या खात्यासाठीच ह्या सवलतीचा फायदा घेतां येईल. चेकबुकें मिळण्यासाठी संबंधित पोस्ट मास्तरांकडे अर्ज करावेत.

त्याच तारखेपासून स्थानिक किंवा बाहेरगांवच्या चेकनें "गुड फॉर पेमेंट" असें न लिहितांहि पैसे ठेवतां येण्याची सवलत भारतांतील सर्व हेड आणि डिपार्टमेंटल पोस्ट कचेऱ्यांत देण्यांत येईल. मात्र हा चेक ठेवीदाराच्या नांवावर किंवा ठेवीदारानें संबंधित पोस्ट मास्तरांच्या नांवावर लिहिलेला असला पाहिजे.

## इंडियन बँक्स असोसिएशनचे नवे पदाधिकारी

### चेअरमन, डेप्युटी चेअरमन व ऑनररी सेक्रेटरी ह्यांची फेर-निवडणूक

इंडियन बँक्स असोसिएशनची वार्षिक सभा २४ मार्च रोजीं होऊन श्री. सी. एच. भाभा (सेंट्रल बँक ऑफ इंडिया) ह्यांची चेअरमन, श्री. एन. एम. चोक्सी (बँक ऑफ बरोडा) ह्यांची डेप्युटी चेअरमन आणि श्री. एस. एल. कोठारी (बँक ऑफ जयपूर) ह्यांची ऑनररी सेक्रेटरी म्हणून फेर-निवडणूक झाली. कमिटीचे इतर सभासद खालीलप्रमाणें आहेत :—

**कमिटीचे इतर सभासद**

श्री. टी. आर. लालवाणी (बँक ऑफ इंडिया), श्री. एम. आर. रुइया (युनायटेड कमर्शिअल बँक), श्री. कमलनयन बजाज (पंजाब नॅशनल बँक), श्री. एस. कृष्णस्वामी अय्यंगार (इंडियन बँक), श्री. संजीवन बानर्जी (युनायटेड बँक ऑफ इंडिया), श्री. पी. व्ही. गांधी (देवकरण नानजी बँकिंग कं.), श्री. एफ. के. एफ. नरिमन (युनियन बँक ऑफ इंडिया), श्री. एन. के. करंजिया (सेंट्रल बँक ऑफ इंडिया), श्री. सी. एकनाथ कामत (कॅनरा बँक).

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## दि बेळगांव् बँक लि., बेळगांव

### वार्षिक साधारण सभेंत डायरेक्टर श्री. गो. वि. सराफ यांनीं केलेलें भाषण

अहवालचे सालीं आपल्या देशांत प्रथमार्धांत चलनवाढ व तिचें नेहमींचे दुष्परिणाम म्हणजे उत्पादनापेक्षा मागणींत सारखी वाढ व महागाई, इत्यादि प्रकार हे जागतिक आर्थिक घटनांनुसारच झाले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी उपाय योजना करीत राहणें हाच बहुतेक देशांतील सरकारापुढें अगत्याचा प्रश्न होता. इंग्लंडनें तर आपला बँक रेट सात टक्क्यांपर्यंत वाढविला. पण पुढारलेल्या देशांपेक्षा आपली आर्थिक अडचण निराळ्या प्रकारची होती. दुसरी पंचवार्षिक योजना ही आपल्या देशांतील साधनसंपत्तीच्या मानानें अवास्तव वाढविलेली असल्याची प्रचीति अधिकारी गोटास येऊन वाढती आयात व उतरती निर्यात यामुळें घटत चाललेली परदेशी हुंडणावळ व अपेक्षेप्रमाणें परदेशाकडून मदत मिळण्याची शक्यता दुरावत चालल्यामुळें या योजनेचा गाभा तरी कसा पार पाडतां येईल, याचीच विवंचना वाढत चालली. यामुळें गेल्या सालच्या बजेटांत संपत्ती व खर्च यांच्यावरहि नव्यानेंच कर बसवून कापडावरहि एक्साईज ड्यूटी व औद्योगिक कंपन्यांकडून सक्तीच्या ठेवींच्या योजना करण्यांत आल्या. याचा परिणाम व्यवहारी वर्गांत उद्वेग, निरुत्साह, वाढूं लागून उत्पादनावरहि प्रतिकूल असा दिसून आला. शेअर बाजारांत घबराट होऊन सर्वच शेअरचे भाव बऱ्याच खालच्या पातळीवर आले. नव्यानें होणारी गुंतवणूक स्थगित होऊन भरमसाट करवाढीमुळें सरकारी बचत योजनांनाहि पूर्वीप्रमाणें पाठिंबा मिळेनासा झाला. सरकारकडून यासाठी गेल्या जूनपासून नव्या आकर्षक दरांत त्या योजना ठेवल्या तरीहि त्यांतील गुंतवणूक गेल्यावर्षापेक्षाहि घटलेली दिसली. अन्नधान्य परिस्थिति तुटीची झाल्यानें धान्याचे दर सप्टेंबरपर्यंत बरेच वाढले व अनेक ठिकाणीं जादा पगार व महागाईच्या मागण्या होऊन, संपहि पुकारले गेले. प. बंगाल मधील बँक नोकरांचा संप हा यापैकीच एक भाग होता. वर्षअखेरीस मात्र रिझर्व बँकेकडून झालेल्या कर्जनियंत्रणाच्या व इतर उपाय योजनामुळें भाव खालीं येऊन परिस्थिती स्थिर होऊं लागली.

या आर्थिक घटनांचे परिणाम बँकांच्या व्यवहारावर साहजिकच दिसून आले. मात्र १९५६ मध्यें ठेवींमध्यें वाढ जी स्थगित झाल्याचें वाटत होतें, त्या मानानें या ठेवींत या साली चांगलीच वाढ दिसून आली. कर्जाची मागणी बरीच वाढली तरी त्या मानानें ताण पडला नाहीं. मात्र या सर्व ठेवी मिळविण्यासाठीं बँकांमध्यें अनिष्ट चढाओढ चालू होती. यांत मोठ्या बँकांचाच जास्त भाग होता हें नमूद करणें आवश्यक वाटतें. यासाली कर्जावरील दराहि वाढविल्यामुळें व त्यांचें प्रमाणहि बरेच फुगल्यामुळें बँकांच्या फायद्यांत भरघोस वाढ दिसून येत असली तरी त्या मानानें ठेवींच्या व्याजाचे व पगारादि खर्चाचे प्रमाणहि बरेच वाढल्यानें हा बोजा मात्र बँकांना कायम वहावा लागणार आहे.

स्थानिक बँकांच्या बाबतींत यंदा महत्वाची घटना म्हणजे रिझर्व्ह बँकेकडून धान्यांवरील कर्जें देण्याबाबतचें नियंत्रण ही होय. धान्योत्पादनांत जरूर ती वाढ होत नसल्यामुळें साठेबाजीला आळा घालण्यासाठीं ही योजना अमलांत आली. या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं याच सालीं नेमण्यांत आलेल्या अशोक मेहता कमिटीचा अहवाल प्रसिद्ध होऊन एकंदरीत धान्याचा व्यापारच क्रमशः खाजगी व्यापाऱ्यांकडून काढून घेण्याची शिफारस करण्यांत आल्यानें या बँकांना आता धान्यतारणावरील कर्जावर गुंतवणुकीच्या दृष्टीनें प्रामुख्यानें अवलंबून राहून चालणार नाहीं. याऐवजी दुसऱ्या बाबींचा अवलंब करणें जरूर आहे. मात्र धान्याइतकी त्वरित व हंगामशीर रकमा परत येण्याची बाब मिळणें कठीण पडणार आहे, हेंहि खरेंच. या बँकांना औद्योगिक कर्जें आपापल्या भागांतील चांगल्या उद्योगधंद्यांना जरूरीप्रमाणें देण्यास वाव आहे. मोठ्या प्रमाणांत अशीं कर्जें देण्यासाठीं कांहीं बँकांनी मिळून असे व्यवहार करणें शक्य होईल. मोठ्या बँकांना सध्या मिळत असलेली री-डिसकाऊंटची सवलत इतर बँकांनाहि उपलब्ध होणें जरूर असल्यानें त्याची मर्यादा कमी केली पाहिजे किंवा मोठ्या बँकामार्फत ही सोय झाली पाहिजे.

आपल्या बँकेकडे या सालीं कर्जाची मागणी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत झाल्यानें चांगला फायदा मिळविता आला, तरी बार्शी येथील नवीन शाखेस नेहमीच्या व्यवहारास मुकावे लागले. गोकाक फॉल्स येथील या सालीं सुरू करण्यांत आलेली आपली शाखा सुरुवातीपासूनच चांगली चालली आहे हें सांगण्यास आनंद वाटतो. कर्जनियंत्रणामुळें मोठ्या प्रमाणांत साठेबाजी होत नसली, तरी सधन शेतकऱ्यांकडील साठे जादा दर मिळवावा म्हणून बाजारांत येत नसल्यामुळें धान्याचे दर खालच्या पातळींत येत नाहीत. धान्योत्पादनहि पुरेसें नाहीं हें नाकारतां येत नाहीं. आमच्याकडील ठेवींमध्यें ठळक वाढ दिसून न येण्याचें कारण आधी सांगितल्याप्रमाणें इतर बँकाबरोबर चढाओढींत भाग घेण्यासाठीं आमचे दर न चढविल्यामुळें पुष्कळ ठेवी दुसरीकडे आकर्षिल्या गेल्या. व्याजाचे दर पुनः खाली येण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें आमचेंच धोरण मजबुतीचें ठरेल असें आम्हांस वाटतें. यासालचें एक वैशिष्टय म्हणजे अलिकडे कांहीं वर्षांपासून बँकांची कर्जें वर्षभर फुगलेलींच राहून हंगाम व गैरहंगाम असा भेद दिसून येत नव्हता. या वर्षी मात्र पुनः हंगामामध्यें फुगलेलीं कर्जें ऑक्टोबरच्या सुरुवातीस ६० टक्क्यापर्यंत खाली आली आणि नवीन हंगामहि थोड्या उशीरा सुरू झाल्यामुळें बँकेकडे चांगल्याच प्रमाणांत रकमेची सवड राहिली. रिझर्व्ह बँकेकडून कर्जाचा आकडा आक्टोबरपर्यंत खाली आणण्याचा तगादा झाला होंहि यास कारणीभूत आहे.

स्टेट बँकेच्या नव्या शाखा आतां जिल्हा व तालुका निहाय निघत आहेत. नुकतेच या बँकेच्या चेअरमननी जाहीर केलें कीं, इतर बँकांशीं चढाओढ आपण करीत नाहीं. अनुभव मात्र निराळा येतो. या नव्या शाखांच्या एजंटाकडून, तेथील इतर बँकांनी त्या शाखेंत खातें ठेवलेंच पाहिजे असा आग्रह धरण्यांत येतो. अशा प्रकारें अनेक शाखांत खातीं ठेवणें इष्ट नसते. परंतु खातें न उघडल्यास नेहमीच्या व्यवहारासहि असहकाराची व विलंबाची वागणूक मिळते. इतकेंच नव्हे तर कांहीं एजंटांनीं लहान नाणीं व नवी नाणीं मिळणार नाहींत असें बजावले! या स्टेट बँकेच्या शाखा रिझर्व्ह बँकेच्या एजंट म्हणून काम करीत असतात हेंहि ते विसरून जातात. बेळगावांत बऱ्याच बँका असून अद्याप क्लिअरिंग हाऊसची सोय होऊं शकत नाहीं. स्टेट बँकेकडून या बाबतींत जरूर तो पाठिंबा मिळत नसल्यामुळें ही दिरंगाई होत आहे. याचा परिणाम, या बँकेशिवाय क्लिअरिंग हाऊस लवकरच सुरू करण्यांत होणार नाहीं असें म्हणतां येत नाहीं. कांहीं

बँकांमध्यें सध्या नव्या शाखा उघडण्याची घडाडी दिसून येत आहे. बँकिंगच्या विकासासाठी या कचेऱ्या नव्या नव्या भागांत झाल्या पाहिजेत हें खरें असलें तरी बँकांची गर्दी असलेल्या ठिकाणींच परवानगी देण्याबाबत रिझर्व्ह बँकेकडून योग्य तो विचार होत नसावा असें दिसतें. नाहींतर शहापूर व कॅम्प बेळगांव सारख्या ठिकाणीं नव्या शाखा सुरू करण्यास नुकर्तीच एका बँकेस परवानगी मिळाली आहे, ती मिळाली नसती. बेळगांव हें बँकांची गर्दी असलेलें ठिकाण आहे हें स्पष्ट असतां व ह्या दोन ठिकाणीं इतर बँकांनीं आपल्या शाखा, परवडत नसल्यामुळें बंद केल्या असतां ही परवानगी मिळाली ती मिळाली नसती; अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. अशा भरमसाट शाखा वाढविल्यानें निष्कारण शक्तीचा अपव्यय होत असतो. तरी रिझर्व्ह बँकेकडून याचा योग्य तो विचार होणें जरूर आहे. नपेक्षा परिस्थितीनेंच मागीलप्रमाणें या प्रकारास इष्ट तो आळा बसेल.

बँकेची प्रगति करण्यांत बँकेच्या सर्व स्टाफनें उत्तम सहकार्य केल्याबद्दल त्या सर्वांचे बोर्डातर्फे मनःपूर्वक आभार मानून मी आपली रजा घेतों.

---

## सहकारी बँकांची १९५६–५७ मधील प्रगति

### मुंबईराज्य सहकारी बँक-संघाचें प्रकाशन

दि बॉंबे स्टेट को. बँक्स असोसिएशन लि. नें मुंबई राज्यांतील सहकारी बँकांसंबंधीं १९५६–५७ वर्षाविषयीं आंकडेवार माहिती एकत्र करून प्रसिद्ध केली आहे. त्यांत जुन्या मुंबई राज्यांतील सहकारी बँकांचेच आंकडे दिलेले आहेत. राज्याच्या पुनर्रचनेनंतर सौराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा ह्यांचा मुंबई राज्यांत समावेश झालेला असला, आणि कर्नाटकांतील जिल्हे म्हैसूर राज्यांत गेले असले, तरी असोसिएशनचें कार्यक्षेत्र अद्याप पूर्वीप्रमाणेंच राहिलेलें आहे; त्यामुळें पूर्वीप्रमाणेंच बँकांची माहिती देण्यांत आलेली आहे.

मुंबई राज्य सहकारी बँक, २१ जिल्हा सहकारी बँका, ३ बँकिंग युनियन्स, ५ औद्योगिक सहकारी बँका आणि १६९ अर्बन सहकारी बँका, ह्यांची जिंदगी, ठेवी, नफा–तोटा, इत्यादींचे आंकडे प्रस्तुत पुस्तिकेंत समाविष्ट आहेत. जमीन गहाणाच्या बँकांचे आंकडे स्वतंत्र विभागांत दिलेले आहेत. ह्या आंकड्यांवरून असें दिसून येतें कीं, मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांची १९५६–५७ मध्यें बरीच वाढ झालेली आहे. केंद्रीय बँक व जिल्हा बँका ह्यांचें स्वतःचें मालकीचें भांडवल ६२ लक्ष रुपयांनीं वाढून तें ४२१ लक्ष रुपये झालें, तर खेळतें भांडवल ६·२१ कोटि रु. नीं वाढून तें ४७·० कोटि रुपयांवर गेलें. येथें कर्जाची रक्कम १६·५२ कोटि रु. चीं २५·६४ कोटि रु. झाली, म्हणजे ही वाढ भांडवलाच्या वाढीची मानानें बरीच जास्त झाली.

१९५६–५७ असेर १६९ अर्बन बँकांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल ३·६९ कोटि रु. होतें; त्यापूर्वीच्या वर्षअसेर १६३ अर्बन बँकांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल ३·३९ कोटि रु. होतें. एकूण ठेवी १५·८८ कोटि रु. वरून १६·५५ कोटि रु. वर गेल्या आणि खेळतें भांडवल २०·६२ कोटि रु. चें २२·१९ रु. झालें. येथें कर्जांत १·५१ कोटि रु. ची वाढ होऊन त्याची रक्कम १०·१३ कोटि रु. झाली.

## इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंट ट्रस्ट लि.

वरील कंपनीस १९५७ मध्यें ५,९२,८९८ रु. नफा झाला. भागीदारांना ५½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. ट्रस्टचें वसूल भांडवल ९९,९९,२५० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड २२ लक्ष रुपयांचे आहेत. ट्रस्टच्या पैशांची गुंतवणूक खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—

### वेगवेगळ्या उद्योगांत वांटणी

| | | % |
|---|---|---|
| बँका | (९) | ७·२४ |
| सिमट | (४) | ३·९९ |
| केमिकल्स | (५) | १·७१ |
| कोळसा | (३) | १·२९ |
| कॉटन, सिल्क | (२६) | १२·९५ |
| वीज, ट्रॅम | (११) | ९·६९ |
| विमा | (५) | २·१९ |
| लोखंड-पोलाद | (६) | ५.६९ |
| ताग | (२८) | ९·०७ |
| खाणी | (५) | १·९७ |
| इतर | (५१) | २३·४३ |
| तेल | (१) | ... |
| कागद | (१०) | २·११ |
| रेल्वेज | (१) | ... |
| रबर | (१२) | ०·५६ |
| मीठ | (१) | १·४६ |
| शिपिंग | (५) | १·३२ |
| साखर | (१६) | ९·८५ |
| चहा | (१२) | ३·१२ |
| टेलिफोन्स | (२) | ०·०२ |
| सरकारी रोखे | (२) | २·३४ |
| | | १००·०० |

### रोख्यांची हिंदी व ब्रिटिश रोख्यांत वांटणी

| | |
|---|---|
| हिंदी | ९५·०६% |
| स्टर्लिंग | ४·९४% |
| | १००·०० |

### सरकारी रोखे, डिबेंचर्स, प्रेफरन्स, ऑर्डिनरी शेअर्स व स्टॉक

| | |
|---|---|
| सरकारी रोखे व डिबेंचर्स | ४·९०% |
| प्रेफरन्स भाग | १५·४४% |
| ऑर्डिनरी शेअर्स व स्टॉक | ७९·६६% |
| | १००·०० |

---

### स्टेट बँकेची प्रगति

स्टेट बँक ऑफ इंडिआकडील ठेवींत गेल्या वर्षी १२२·८ कोटी रुपयांची भर पडून त्यांची रक्कम ३४४·३ कोटी रु. झाली. सर्व शेडयूल्ड बँकांनीं मिळून दिलेल्या कर्जापैकीं स्टेट बँकेनें दिलेलीं कर्जें १७·१% वरून १९·२% वर गेलीं. १९५७ मध्यें ९१ नव्या शाखा उघडण्यांत आल्या; १९५६ मध्यें ४६ शाखा उघडल्या होत्या. आतां बँकेच्या ६३२ शाखा झाल्या आहेत. बँकेला १·८७ कोटी रु. नफा झाला. भागीदारांना १६% डिव्हिडंड कायम आहे.

## इंग्रज स्त्रियांतील वाढतें धूम्रपान

### गेल्या वीस वर्षांत तिपटीनें वाढ

ग्रेट ब्रिटनमध्यें पुरुषांपैकी ७५% व स्त्रियांपैकी ४१% धूम्रपान करतात. प्रत्येक आठ पुरुषांतला एक पुरुष फक्त पाइपच ओढतो; बाकीचे सात दररोज सरासरीनें १८ सिगारेट ओढतात. ह्यापैकी १३% लोक पाइपहि ओढतात. धूम्रपान करणाऱ्या स्त्रिया दररोज सरासरीनें फक्त १० सिगारेट संपवितात; फक्त १४% स्त्रिया २० पेक्षा ज्यास्त सिगारेट ओढतात. ग्रेट ब्रिटनमध्यें खपणाऱ्या सिगारेटपैकी ७०% सिगारेट पुरुष फस्त करतात असा हिशेब होतो. गेल्या कांहीं वर्षांत धूम्रपानाचा स्त्रियांतील प्रसार वाढला आहे. १९३९ च्या मानानें तुलना केली, तर सिगारेटचा पुरुषांतील खप जवळ जवळ कायमच आहे; स्त्रियांत तो तिपटीनें वाढला आहे. स्त्रियांचें धूम्रपान आणखी वाढण्याचा रंग दिसतो.

**धूम्रपानाचें वयानुसार वर्गीकरण**

| वय | धूम्रपान करणारांचें प्रमाण % | | दर माणशीं सिगारेटचा उठाव | |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| १६–१९ | ५५ | ३३ | १०१ | ५८ |
| २०–२४ | ६७ | ३४ | | |
| २५–२९ | ७४ | ४७ | ११७ | ७१ |
| ३०–३४ | ९५ | ५७ | | |
| ३५–४९ | ७८ | ४८ | १४० | ८० |
| ५०–५९ | ७९ | ३७ | | |
| ६० चे वर | ७९ | २९ | १०१ | ५२ |
| सर्व वयाचे | ७५ | ४१ | १२४ | ७१ |

---

### व्होल्टेअरचें कागदी चलनावरील मत !

इंटरनॅशनल मोनेटरी फंडाचे मॅनेजिंग डायरेक्टर, मि. जेकबसन ह्यांनीं मुंबई येथील एका पत्रकार–मुलाखतींत रुपयाच्या अवमूल्यनाचे विरुद्ध आपलें मत व्यक्त केलें होतें. "कागदी चलनावरील लोकांचा विश्वास एकदां उडाला, कीं तें चलन त्याच्या खऱ्याखुऱ्या किंमतीची पातळी गांठतें" असें सुप्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार होल्टेअर ह्यानें म्हटलें असल्याचें मि. जेकबसन ह्यांनीं सांगितलें होतें. "१८ व्या शतकांतील ह्या साहित्यिकाचा अर्थशास्त्राशीं कांहींच संबंध नव्हता; तेव्हां खरोखरच व्होल्टेअरनें असें मत व्यक्त केलें होतें काय ?" असा प्रश्न मि. जेकबसन ह्यांना करण्यांत आला. त्याला त्यांनीं उत्तर दिलें, "होय, व्होल्टेअरनें असें मत व्यक्त केलें होतें, हें खरेंहि वाटणार नाहीं. पण त्याला नॅन्सी मिटफर्डकृत "व्होल्टेअर इन लव्ह" ह्या पुस्तकांत आधार सांपडतो– "१७२० मध्यें सुप्रसिद्ध स्कॉचमन लॉ ह्यानें कागदी चलनास प्रारंभ केला तेव्हां पुष्कळांचें नुकसान झालें. व्होल्टेअरनें मात्र आपले पैसे सुरक्षित राखले. लोक विकूं लागलेल्या चलनी नोटांसंबंधीं त्यावेळीं त्यानें लिहिलें, 'ते लोक कागदाला त्याची रास्त किंमत प्राप्त करून देत आहेत.'"

---

**हौशी प्रवाशांसाठी सोयी**—कर्नाटक राज्यांतील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठी येणाऱ्या प्रवाशांची अधिक सोय करण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बराच खर्च करण्यांत येणार आहे. हंपी येथील विजयानगरचे अवशेष, विजापूरचा गोलघुमट, बदामी येथील लेणीं, इत्यादि प्रेक्षणीय स्थळें राज्यांत आहेत.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह रु. १,१४,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लिमिटेडचा सुवर्ण महोत्सव

### गेल्या पन्नास वर्षांतील कांहीं उल्लेखनीय बाबी

**"स्वदेशी" च्या प्रेरणेनें स्थापना व उद्देश :**—परदेशी मालावर बहिष्कार घालणें व स्वदेशी माल वापरणें या कल्पनेनें प्रेरित होऊन, सातार्‍यांतील कांहीं तरुण व उत्साही मंडळींनीं सन १९०६ सालीं खात्रीचा असा स्वदेशी माल योग्य दरांत नेहमीं जनतेस मिळावा यासाठी मिती चैत्र शु॥ १ शके १८२८ या शुभ दिवशीं सातारा येथें "दि सातारा स्वदेशी व्यापारी मंडळी" या नांवाचें स्वदेशी मालाचें दुकान सातारचेच कै. विष्णुदास गांधी यांचे भवानी पेठेंतील घरांत स्थापन केलें. या दुकानचे सुरवातीचें भांडवल फक्त ७०० रुपयांचें होतें. तें प्रत्येकीं १०० रु. प्रमाणें कै. ल. मो. आपटे, कै. वा. ग. चिरमुले, कै. रा. ग. सोमण, कै. ना. कृ. आगाशे, कै. कृष्णाजीपंत कदुस्कर, कै. ना. कृ. दांडेकर व श्री. गोविंदराव श्रोत्री, या मंडळींनीं दिलें होतें. हें दुकान स्थापन करतांना खात्रीचा स्वदेशी माल योग्य व माफक दरांत सर्वसाधारण जनतेस मिळावा हें ध्येय पुढें ठेविलें होतें. त्यापुढील वर्षीं म्हणजे ता. २०-८-१९०७ रोजीं याच दुकानचें रूपांतर लिमिटेड कंपनींत करण्यांत आलें. पहिल्या १५ महिन्यांतच या कंपनीनें रु. २५,००० ची उलाढाल करून रु. ९५५ इतका निव्वळ नफा मिळविला.

**बँकिंगला प्रारंभ :**—पुढें गांवांत स्वदेशी माल अनेक ठिकाणीं मिळूं लागल्यानें कंपनीनें आपल्या मूळच्या कल्पनेस मुरड घालून आपलें लक्ष उत्तरोत्तर सराफी धंद्यावर (बँकिंग) केंद्रित करण्यास सुरवात केली. पुढें स्वदेशी व्यापारी मंडळी हें जरी नांव तसेंच ठेविलें, तरी प्रत्यक्ष धंदा मात्र सराफीचाच सुरू ठेविला. कापडधंदा बंद केला. हाच या बँकेचा प्रारंभ होय.

**श्री. चिरमुले ह्यांचें मार्गदर्शन :**—अगदीं सुरवातीपासून सन १९५० पर्यंत कै. आण्णासाहेब चिरमुले हेच संचालक मंडळाचे अध्यक्ष होते. व्यवस्थितपणा, हिशेबी दृष्टि, कामाची दक्षता, कामावरील दैनंदिन काटेकोर देखरेख, इत्यादि त्यांच्या गुणांमुळें संस्थेस सुरवातीपासूनच चांगलें वळण लागून स्थैर्य प्राप्त झालें. पहिलें खातें श्री. आर. डी. आष्टेकर वकील यांच्या नांवचें असून तें गेलीं पन्नास वर्षें चालूं आहे.

**डायरेक्टरांचा स्वार्थत्याग :**—सन १९४० सालापर्यंत डायरेक्टर बोर्डावरील एका सभासदानें खजिनदार व एकानें सेक्रेटरी म्हणून काम करावयाचें, अशी प्रथा होती. बोर्डाच्या सभासदांपैकी कित्येकांनीं अगर भागीदार व्यक्तींनीं या कंपनीची सुरवातीची दैनंदिन कामें विनावेतन केलेली आहेत. त्याचप्रमाणें या कंपनीच्या बोर्डाचें दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या सभासदांपैकीं कोणीहि सन १९४७ पर्यंत डायरेक्टर म्हणून मुशाहिरा घेतला नाहीं.

**शाखा विस्तार :**—बँकेच्या सुरवातीस फक्त सातारा शहर हेंच मर्यादित क्षेत्र संचालकांचे डोळ्यांपुढें होतें. पण अनुभवानें या जिल्ह्यांत सोईस्कर जागीं शाखा सुरू करण्यांत आल्या. अजूनहि सातारा जिल्हा हेंच कार्यक्षेत्र बँकेनें ठरविलें आहे, व योग्य काळीं व ठिकाणीं नवीन शाखा काढण्याचा विचार आहे.

**मूळ भागीदारांना १०० रु. वर ३९९ रु. डिव्हिडंड :**—भागीदारांच्या दृष्टीनें विचार केल्यास त्यांना संस्थेचे सुरवातीपासून सन १९५८ अखेर दरसाल बिनचूक ६ ते १० टक्के पर्यंत डिव्हिडंड मिळालेलें आहे. म्हणजे ज्या भागीदारांनीं १९०६ सालीं रु. १०० रोख भांडवल गुंतवलें, त्यांना १९५६ अखेर डिव्हिडंड रूपानें रुपये ३९९ मिळालेले आहेत.

**व्यवहाराची वाढ**

| वर्ष | भांडवल | गंगाजळी | ठेवी | कर्जें, वगैरे | नफा |
|---|---|---|---|---|---|
| १९०७ | ३९०० | ५७५ | ११३०० | ९००० | ९५५ |
| १९१७ | ६९२५ | १२४०० | ८७००० | ८४००० | १३२८ |
| १९२७ | १३०१५ | २१३०० | २९५००० | २९८००० | २२९० |
| १९३७ | २५००० | २७००० | १५२६००० | ५१२००० | ३००० |
| १९४७ | २३३६९० | ५२४०० | ४३९५००० | २००६००० | २१५०० |
| १९५२ | २४०८८० | १५८००० | ४०१५००० | २९९६५०० | ३३००० |
| १९५६ | २४०८८० | २५३४०० | ४३०३४०० | २४८२८०० | ५३९०० |
| १९५७ | २४०८८० | २७४००० | ४४६६००० | ०७९२००० | ६६२०० |

### विमानवहातुकींत भारताचें स्थान

जगांतील विमानवहातूक कंपन्यांचे जवळ उतारू वहाणारीं ६,००० विमानें आहेत; आणि आणखी १,५०० विमानांसाठी ऑर्डरी नोंदविण्यांत आलेल्या आहेत. ह्यांतील ६,००० विमानांपैकीं ९९ विमानें भारतीय कंपन्यांजवळ आहेत आणि १,५०० विमानांच्या ऑर्डरीपैकी १९ विमानांची ऑर्डर भारतीय कंपन्यांनीं दिलेली आहे. केवळ माल वहाणारीं ७५७ विमानें आज जगांत वहातुक करीत आहेत, त्यांपैकी भारतांत सहा आहेत.

### महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचें ग्रंथालय

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचें शास्त्रीय ग्रंथालय कॉमनवेल्थ इमारतींतील संग्रहालयाच्या सभागृहांत नेण्यांत येणार असून त्यासाठीं मंडई मनोर्‍यावरील ग्रंथालय दि. २९-३-५८ ते १०-४-५८ अखेर बंद राहील. ग्रंथालय संग्रहालय सभागृहांत दिनांक १०-४-५८ रोजीं उघडेल.

**कागदाचा नवा कारखाना**—पंजाबमध्यें वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करणारा खाजगी मालकीचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं ६ कोटी रुपये भांडवल लागेल, व तो उभारण्याच्या कामीं फिनलंडच्या तज्ज्ञांचें साह्य घेण्यांत येईल.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.